**दि.कि.अर्ज क्र.२३१/२०२४ मधील नि.३३ वरील आदेश**
**(शांतीसागर ट्रेडींग कंपनी वि. सांगली जिल्हा बिजोत्पादक सह. संघ व अन्य)**
(CNR No.MHSN020025532024)

अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दि.प्र.सं. आदेश ६ नियम १७ अन्वये मूळ अर्जामध्ये दुरुस्तीकरिता दाखल केलेला आहे. अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे, अर्जदार यांनी मूळ अर्ज दावा गाळयास असलेला विज पुरवठा जाबदार क्र.१ यांनी बेकायदेशीररित्या व अनाधिकाराने बंद केलेला असल्याने तो पुर्ववत सुरळीत करुन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी जाबदार क्र.२ यांच्याकडे माहिती अधिकराअंतर्गत माहिती मागविली होती. परंतु, सदरची माहिती मूळ अर्ज दाखल केल्यानंतर अर्जदारास मिळून आली आहे. त्यानुसार काही बाबी नव्याने निष्पन्न झाल्याने त्या अनुषंगाने मूळ अर्जामध्ये दुरुस्ती करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**२.** अर्जदारचे कथनानुसार, जाबदार क्र.१ यांचेकडे भूखंड क्र.३४८ चे इमारतीमध्ये अर्जदार व्यतिरिक्त ५ भाडेकरु आहेत. त्याकरिता जाबदार क्र.१ यांनी जाबदार क्र.२ यांचेकडून स्वत:चे नावे एकूण ४ विज जोडणी मंजूर करुन घेतले आहेत. सदर मिटर जोडणीची देखरेख ही केवळ जाबदार क्र.१ यांचेकडे आहे व या मिटर जोडणीमधूनच जाबदार क्र.१ हे अर्जदारासह इतर भाडेकरुंना विज पुरवठा करीत असतात. त्यामुळे, कोणत्या मिटरमधून अर्जदार यांना विज पुरवठा करावयाचा हे सर्वस्वी जाबदार क्र.१ यांचे नियंत्रणामध्ये आहे. अर्जदार यांचे दुकान गाळयास नक्की कोणत्या ग्राहक क्रमांकाचे मिटरमधून विज पुरवठा होत होता, याचे ज्ञान अर्जदार यांना जाबदार क्र.१ यांनी कधीही दिले नाही. अर्जदार यांच्या दुकान गाळयांना जाबदार क्र.१ यांचे नावावर असलेल्या ग्राहक क्रमांकाच्या मिटरमधूनच विज पुरवठा होत आलेला आहे. अर्जदार यांनी स्वतंत्र विज जोडणीच्या डिपॉझीट पोटी जरी रक्कम रुपये ९५०६/- अदा केले असले तरीही, ती मिटर जोडणी जाबदार क्र.१ यांचे नावे आहे. अर्जदार यांचे नावाने स्वतंत्र मिटर कनेक्शन नाही. असे असताना, जाबदार क्र.१ यांनी अर्जदाराकडून ग्राहक क्र.२७९९४१८२५७९१ साठी

डिपॉझिट रक्कम भरुन घेतली असली तरीही, अर्जदारचे दुकानगाळयांना त्या जोडणीमधून विज पुरवठा न करता दुसऱ्याच ग्राहक जोडणी क्र.२७९९४१८२५८१२ मधून विज पुरवठा जोडला असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच ज्या मिटर जोडणीसाठी अर्जदारकडून डिपॉझिटची रक्कम भरुन घेतली त्या मिटर जोडणी क्रमांक २७९९४१८२५७९१ चा विज पुरवठा भूखंड क्र.३४८ मधील जाबदार क्र.१ यांनी त्यांचे दुसरे भाडेकरु यांना केल्याची बाब ही स्पष्ट झाली आहे. अशाप्रकारे जाबदार क्र.१ यांनी जाणीवपुर्वक मिटर जोडणीमध्ये फेरबदल करुन गुंतागूंत निर्माण केली आहे. अशाप्रकारे, जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांचे दुकान गाळयांना विजपुरवठा करीत असलेल्या मिटर जोडणी क्र.२७९९४१८२५८१२ बंद करणेचा अर्जदार यांचे अपरोक्ष निर्णय घेतला व त्याअनुषंगाने दिनांक २५.०७.२०२४ रोजी जाबदार क्र.२ यांना पत्र देवून मिटर जोडणी क्र.२७९९४१८२५८१२ मधील विज पुरवठा त्वरीत बंद करणेस कळविले. सदरची बाब अर्जदार यांना जाबदार क्र.२ यांनी माहिती अधिकारांतर्गत दिलेल्या माहितीवरुन स्पष्ट झाली आहे.

**३.** जाबदार क्र.१ यांचे सांगणेवरुन अर्जदार यांनी दिनांक २८.०२.२०२३ रोजी नवीन ग्राहक जोडणीपोटी अनामतची रक्कम रुपये ९,५०६/- भरणेपुर्वी संपुर्ण भूखंड क्र.३४८ ला जाबदार क्र.१ यांच्या नावे असलेल्या एकाच ग्राहक क्रमांकाच्या जोडणीमधून अर्जदारसह इतर सर्व भाडेकरु यांना विज पुरवठा केला जात होता व त्यापोटी जाबदार क्र.१ हे अर्जदार यांचे दुकानगाळयास होत असलेल्या विज पुरवठयाच्या विज बिलाची रक्कम जाबदार क्र.१ स्वत: अर्जदारकडून जमा करुन घेत असत. तंतोतंत विज बिलाची रक्कम अर्जदार व इतर भाडेकरुंनी परस्पर दयावी या हेतूने जाबदार क्र.१ यांनी गाहक क्र.२७९९४१८२५८१२ हे जाबदार क्र.२ कडून स्वत:चे नावे मंजूर करुन घेतले. मात्र, ग्राहक क्र.२७९९४१८२५७९१ करिता, अनामत रक्कम मात्र अर्जदारकडून जमा करुन घेतली आहे. अशाप्रकारे अर्जदार यांचे दुकान गाळयास सदर ग्राहक क्र.२७९९४१८२५८१२ मधून विज पुरवठा होत होता.

**४.** तसेच अर्जदाराने मूळ अर्जातील कलम ९अ नंतर - “९आ अर्जदार यांचे

दुकान गाळा क्र.२ व ३ यास व्यापारी कारणाकरिता अर्जदारचे नावे स्वतंत्र ग्राहक क्रमांकाने विज कनेक्शन देणेचा जाबदार क्र.२ यांना आदेश व्हावा", तसेच अर्जदार ही नोंदणीकृत भागीदारी फर्म असून तिचे दुसरे भागीदार श्री. बाळासाहेब बाबगोंडा पाटील यांनाही अर्जदार सदरी भागीदार म्हणून सामील करणेस व टायटल शिर्षकामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मागितली आहे.

**५.** जाबदार क्र.१ यांनी नि.३५ कडे प्रस्तुत अर्जास म्हणणे सादर करुन अर्जदाराची सर्व कथने अमान्य केलेली आहेत. जाबदार क्र.१ यांच्या कथनानुसार, सदरची कार्यवाही ही दाव्याची नसल्याने त्यास दि.प्र.सं.आदेश ६ नियम १७ च्या तरतुदी लागू पडत नाहीत. तसेच अर्जदार यांनी मूळ अर्जात पुर्वी कधीही न मांडलेली व मूळ अर्जाचे स्वरुप बदलेल अशी कथने अर्जदार मांडू पहात आहेत. या दुरुस्ती अर्जात अर्जदार मूळ अर्जात ग्राहक जोडणी क्र.२७९९४१८२५८१२ बाबत जी केस मांडू पहात आहेत ती अर्जदार यांनी मूळ अर्जात मांडलेली नाही. उलट अर्जदारांनी त्यांच्या मूळ अर्जात ग्राहक क्र.२७९९४१८२५७९१ ची जोडणी अर्जदार यांना जाबदार क्र.१ यांनी दिनांक १२.०१.२०२३ रोजी मंजूर केल्याची व या जोडणीमधून अर्जदारांना विज पुरवठा केल्याची तक्रार केली आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज हा अर्जदारांनी पश्चातबुध्दीने त्यांचा निशाणी क्र.५ चा अर्ज नामंजूर झाल्यानंतर केलेला आहे. अर्जदार हे मूळ अर्जातील कथनांशी बगल देण्यासाठी संपुर्ण मूळ अर्ज बदलू पहात आहेत. त्यामुळे, मूळ अर्जाचे स्वरुप बदलून जाईल अशी दुरुस्ती प्रचलित कायदया प्रमाणे करता येणारनाही. अर्जदारांनी माहितीच्या अधिकाराखाली कागदपत्र मिळण्याआधी मूळ अर्ज दाखल करण्याची गडबड करण्याचे काही कारण नव्हते त्यामुळे, अर्जदार लबाडीने खरी वस्तुस्थिती घेवून न्यायालयासमोर आलेले नव्हते. त्यामुळे, अर्जदारांचा दुरुस्ती मागणीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा असे म्हणणे दिले.

**६.** जाबदार क्र.२ यांनी नि.३६ कडे आपले म्हणणे देवून अर्जदारचा नि.३३ वरील अर्ज व त्यातील कथने ही खोटी, पश्चातबुध्दीने दिलेली असल्याचे तसेच संपुर्ण मूळ

अर्जाचे स्वरुप बदलत असल्याने सदरचा अर्ज नामंजूर करणेत यावा असे म्हणणे दिले.

**७.** अर्जदार, जाबदार क्र.१ व २ तर्फे सन्माननीय विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. अभिलेख न्याहाळला.

**८.** अर्जदार यांनी दाव्यामध्ये वर नमूद केल्याप्रमाणे सूचित दुरुस्ती मागितलेली आहे. जाबदार यांनी त्यास विरोध दर्शविलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, नि.१ वरील मूळ अर्जामध्ये अर्जदारांनी कलम ५ मध्ये, 'अर्जदार यांचे दुकानगाळयांना स्वतंत्र मिटर कनेक्शन क.२७९९४१८२५७९१ देखील जाबदार क्र.२ यांनी दिनांक १२.०१.२०२३ रोजी मंजूर केलेले आहे. त्यापुर्वी जाबदार क्र.१ यांचे नावे असलेल्या मिटर कनेक्शनमधून अर्जदार यांचे दुकानगाळयास अखंडपणे विज पुरवठा केला गेला आहे' असे नमूद केलेले आहे. अर्जदार व जाबदार क्र.१ व २ यांच्या वादपत्रांचे अवलोकन केले असता दोन मिटर जोडणी क्रमांक अनुक्रमे २७९९४१८२५८१२ व २७९९४१८२५७९१ हे वादातील मुद्दयामध्ये प्रामुख्याने दिसून येतात. नि.१ वरील मूळ अर्जाचे निरीक्षण केल्यावर अर्जदारास कोणत्या मिटर जोडणी क्रमांकामधून विज पुरवठा होत होता हे सुस्पष्टपणे नमूद केले नसल्याचे आढळून येते. सदर अर्जाद्वारे अर्जदार यांनी मागितलेल्या प्रस्तावित दुरुस्तीमधून अर्जदार यांनी त्यांना जाबदार क्र.१ ने ग्राहक जोडणी क्र.२७९९४१८२५७९१ चे अनामत पोटी रक्कम भरुन घेवून दुसऱ्याच ग्राहक जोडणी क्र.२७९९४१८२५८१२ मधून विज पुरवठा जोडला असल्याबाबत कथन केले आहे.

**९.** अर्जदार यांनी जाबदार क्र.२ कडून माहिती अधिकाराअंतर्गत मागविलेली माहिती त्यांना मूळ अर्ज दाखल केल्यानंतर मिळून आली असे नमूद केले आहे. आपल्या कथनाच्या पृष्ठयर्थ अर्जदार यांनी नि.३३ सोबत जाबदार क्र.२ यांनी अर्जदार यांना माहिती अधिकारांतर्गत दिलेले पत्र जोडल्याचे दिसून येते. सदर पत्राचे वरकरणी अवलोकन केले असता, त्यावर दिनांक २९ ऑगस्ट २०२४ ही तारीख नमूद असल्याचे व ग्राहक क्र.२७९९४१८२५८१२ ची विज जोडणी बंद केली आहे असे नमूद केल्याचे दिसून येते. अर्जदाराने त्यांचा मूळ अर्ज दिनांक १२.०८.२०२४ रोजी दाखल केला असल्याचे दिसून

येते. त्यावरुन अर्जदारास सदरची माहिती ही त्यांनी या अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे मूळ अर्ज दाखल केल्यानंतर मिळून आली असल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे, मूळ अर्जात नमूद केलेल्या मुद्दयांबाबत नव्याने बाबी निष्पन्न झाल्या असल्याबाबत (subsequent discovery of new facts) अनुमान काढता येते. त्याचबरोबर अर्जदाराने नि.३/६५ कडे त्यांनी जाबदार क्र.२ कडे माहिती अधिकारांतर्गत केलेल्या अर्जाची छायांकित प्रत जोडलेली आहे. त्याचबरोबर, वर नमूद दोन्हीही मिटर क्रमांकाबाबत अभिलेखावर उपस्थित असलेल्या कागदपत्रांवर जाबदार क्र.१ चेच नाव दिसून येते.

**१०.** त्यामुळे, जाबदार क्र.१ च्या विद्वान वकीलांनी युक्तिवाद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर केल्यास मूळ वादपत्राद्वारे विरोधी पक्षाच्या हक्कात दिलेली कबुली काढून घेतली जात आहे (withdrawal of admissions made in favour of opposite party), तरीदेखील वर नमूद केल्याप्रमाणे मूळ अर्जात नमूद केलेल्या मुद्दयांबाबत नव्याने बाबी निष्पन्न झाल्या असल्याबाबत (subsequent discovery of new facts) अनुमान काढता येत असल्याने सदरची दुरुस्ती करण्यास अर्जदारास परवानगी देणे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने क्रमप्राप्त वाटते. तसेच मुद्दे/वादप्रश्न निश्चित करण्याआधी दुरुस्तीच्या हेतुसाठी कार्यवाहीच्या अंगभूत गुणांगुणावर भाष्य करणे न्यायाच्या दृष्टीने योग्य होणार नाही.

**११.** जाबदार क्र.१ ने महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा कलम २९ अन्वये केलेल्या अर्जास दि.प्र.सं.आदेश ६ नियम १७ च्या तरतुदी लागू पडत नाहीत अशी हरकत आपल्या म्हणण्यामध्ये घेतलेली दिसते. परंतु, दि.प्र.संहितेच्या कलम १४१ प्रमाणे या संहितेमध्ये नमूद केलेली प्रक्रिया ही सर्वप्रकारच्या संकिर्ण कार्यवाहींना लागू असल्याचे विषद आहे. सदर मूळ अर्ज हा किरकोळ दिवाणी अर्ज म्हणून दाखल केला असल्याने सदर अर्जास दि.प्र.सं.आदेश ६ नियम १७ च्या तरतुदी लागू होतात असे न्यायालयाचे प्रथमदर्शनी मत आहे.

**१२.** मात्र त्याचबरोबर, अर्जदार यांनी मूळ अर्जातील विनंती कलम '९अ' नंतर वर नमूद केल्याप्रमाणे '९आ' नमूद करण्यास मागितलेली परवानगी ही महाराष्ट्र भाडे नियंत्रण

कायदयाच्या कलम २९ च्या व्याप्तीमध्ये बसत नसल्याचे तसेच तशाप्रकारची दुरुस्ती करण्यास परवानगी दिल्यास कलम २९ अन्वयेच्या अर्जाचे स्वरुप बदलून त्यास कारक ताकीदीच्या दाव्याचे (Mandatory injunction) स्वरुप येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचबरोबर, अर्जदारने सदर दुरुस्ती अर्जाद्वारे तिचे दुसरे भागीदार श्री. बाळासाहेब बाबगोंडा पाटील यांना देखील अर्जदार सदरी भागीदार म्हणून सामील करण्यास व त्याप्रमाणे अर्ज शिर्षकामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मागितलेली आहे. परंतु, दि.प्र.संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे केवळ वादपत्रामध्ये नमूद तथ्यांमध्ये दुरुस्ती करता येते. मूळ कार्यवाहीमध्ये कोणत्याही पक्षकारास सामील करायचे असल्यास त्याबाबत दि.प्र.संहितेमध्ये स्वतंत्र तरतुदी दिलेल्या असल्याने त्याबाबत दुरुस्ती करण्याचे आदेश दि.प्र.संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणेच्या अर्जामध्ये करणे योग्य ठरणार नाही.

**१३.** अर्जदाराने आपल्या कथनांच्या पृष्ठयर्थ मा. ना. सर्वोच्च न्यायालय यांचे काही न्यायनिवाडे सादर केलेले आहेत ते पुढीलप्रमाणे.

1. Raghu Thilak D. John V/s. S. Rayappan & Ors.,(2001)2 S.C.C. 472
2. Rajesh Kumar Aggarwal & Ors. V/s. K. K. Modi & Ors., 2006 (4) SCC 385.
3. Jayanti Roy V/s. Dass Estate Pvt. Ltd., (2002) 5 SCC 175.
4. Sampath Kumar V/s. Ayyakannu & Ors., (2002) 7 SCC 559.

**१४.** वरील सर्व न्यायनिवाडयांचे अवलोकन केले. या सर्व न्यायनिवाडयांमध्ये मा. ना. सर्वोच्च न्यायालयाने केलेली निरीक्षणे ही कायदयाच्या प्रस्थापित तत्वांबाबत असल्याने ती या न्यायालयावर बांधील आहेत. परंतु, या सर्व न्यायनिवाडयांमधील तथ्यांचे अवलोकन केले असता, त्यातील प्रकरणांमधील पक्षकारांनी दि.प्र.सं.आदेश ६ नियम १७ प्रमाणेचे अर्ज हे दाखल केलेल्या दाव्यांमध्ये केले असल्याचे दिसून येते. परंतु, प्रस्तुतची कार्यवाही ही महाराष्ट्र भाडे नियंत्रण कायदा कलम २९ प्रमाणे असल्याने तिला पुर्णपणे दाव्याचे स्वरुप आहे असे निर्विवादपणे म्हणता येणार नाही. त्यामुळे, सदरचे न्यायनिवाडे

प्रस्तुत प्रकरणास व अर्जास पुर्णपणे लागू नाहीत असे न्यायालयाचे प्रामाणिक मत आहे.

**१५.** वरील विश्लेषणावरुन असे दिसून येते की, अर्जदार यांना मूळ अर्जातील कलम ५ मध्ये सदर अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. परंतु, मूळ अर्ज कलम ९ मध्ये व मूळ अर्जाच्या शिर्षकामध्ये अर्जदार फर्मच्या दुसऱ्या भागीदारास सामील करणेस परवानगी देणे योग्य ठरणार नाही. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाच्या कलम २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे विहित मुदतीत मूळ अर्जामध्ये दुरुस्ती करुन दुरुस्त अर्जाची प्रत अभिलेखावर सादर करावी.

ONKAR SANJAY SHASTRI

Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI
Date: 2024.11.16 17:53:59 +0530

(ओंकार सं. शास्त्री)
११ वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
सांगली.

सांगली.
दिनांकः-१६.११.२०२४

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | R. B. Samalewale |
| Name of the Court | :- | Shri. O. S. Shastri.<br>11th Jt. Civil Judge Jr. Dn., Sangli. |
| Date of decision | :- | 16.11.2024 |
| Order signed by P.O. on | :- | 16.11.2024 |
| Order uploaded on | :- | 16.11.2024 |